भारतीय पृथ्वि विज्ञान मंत्रालय, भारतीय हवामान शास्त्र विभाग आणि
डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली सह्योगीत

# ग्रामिण कृषि मौसम सेवा प्रकल्प

उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग

## हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला पत्रक – सिंधुदुर्ग

कालावधी (दिनांक २०.०६.२०२० ते २४.०६.२०२०)

| अंक ४८/२०२० | दिनांक १९.०६.२०२० | कालावधी ५ दिवस |
|---|---|---|

| मागील आठवड्यातील हवामान घटकांची प्रत्यक्ष नोंद (१२/०६/२०२० ते १८/०६/२०२० पर्यंत) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचे हवामान घटकांचे पूर्वानुमान (वैधता २०/०६/२०२० ते २४/०६/२०२० पर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १२/०६ | १३/०६ | १४/०६ | १५/०६ | १६/०६ | १७/०६ | १८/०६ | दिनांक | २०/०६ | २१/०६ | २२/०६ | २३/०६ | २४/०६ |
| ४८.६ | १०६.२ | ५९.४ | २४.६ | ७७.२ | ७१.१ | ११२.८ | पाऊस (मि. मी) | ६० | ६८ | ६५ | ६७ | ४९ |
| २७.५ | २८.७ | ३१.० | ३४.५ | ३५.५ | २७.५ | २९.५ | कमाल तापमान (अं. से) | ३० | ३१ | ३१ | २९ | २९ |
| २३.० | २३.० | २३.५ | २४.५ | २४.५ | २३.८ | २३.५ | किमान तापमान (अं. से) | २३ | २३ | २२ | २२ | २३ |
| ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | मेघाच्छादन (ऑक्टा.) सकाळ | ८ | ८ | ८ | ८ | ८ |
| ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | मेघाच्छादन (ऑक्टा.) दुपार | | | | | |
| ९५ | ९६ | ९२ | ९५ | १०० | ९३ | १०० | सकाळची सापेक्ष आर्द्रता(%) | ९१ | ९० | ९१ | ९० | ९० |
| ९५ | ८९ | ७५ | ७६ | ९३ | ९० | ८२ | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ८४ | ७६ | ७६ | ८० | ७९ |
| १.५ | १.८ | १.० | २.४ | २.८ | ०.५ | १.१ | वा-याचा वेग (कि.मी/तास) | १० | ८ | ७ | ६ | ७ |
| स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | वा-याची दिशा सकाळ | नैऋत्य कडे | दक्षिणोत्तर/ नैऋत्य कडे | दक्षिणे कडे | दक्षिणे कडे | दक्षिणोत्तर/ आग्नेय कडे |
| स्थिर | स्थिर | उत्तरोत्तर/ ईशान्य | /ईशान्य | स्थिर | स्थिर | उत्तरोत्तर/ ईशान्य | वा-याची दिशा दुपार | | | | | |

| मागील वर्षातील (२०१९) पर्जन्य (मि. मी) | १/०१/२०२० पासुनचे पर्जन्य (मि. मी) | १/०६/२०२० पासुनचे पर्जन्य (मि. मी) | मागील आठवड्यातील पर्जन्य (मि.मी) |
|---|---|---|---|
| ४५९१.० | ७४१.५ | ७३८.३ | ४९९.९ |

| पुढील ५ दिवसाच्या हवामानाची सामान्य स्थिती: | सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये येत्या पाच दिवसामध्ये तापमान स्थिर राहण्याची शक्यता आहे, त्याचबरोबर दिनांक २० ते २४ जून २०२० दरम्यान बहुतांश ठिकाणी मुसळधार तर दिनांक २० जून २०२० रोजी तुरळक ठिकाणी मुसळधार ते अति मुसळधार स्वरूपाच्या पावसाची शक्यता असून हवामान आर्द्र व पूर्णतः ढगाळ राहून वाऱ्याच्या वेगातही वाढ होण्याचा अंदाज प्रादेशिक हवामानशास्त्र केंद्र, मुंबई यांच्या कडून वर्तविण्यात आला आहे. |
|---|---|

## हवामान पुर्वानुमान कृषि सल्ला

| पिकाचे नाव | पिकाची अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| भात, | रोपवाटीका व्यवस्थापन व पुनर्लागवड | येत्या आठवड्यात सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये बहुतांश ठिकाणी मुसळधार स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे तरी ज्या ठिकाणी भात पिकाची पेरणी झाली होती व रोपे उगवून आली आहेत अश्या ठिकाणी चारही बाजुंनी खोल चारी काढावी यामुळे पाऊस जास्त झाला तरी पाण्याचा निचरा होण्यास मदत होईल व कोवळी रोपे मरण्याचे प्रमाण कमी राहिल.<br>दिनांक २० ते २४ जून २०२० दरम्यान बहुतांश ठिकाणी मुसळधार तर दिनांक २० जून २०२० रोजी तुरळक ठिकाणी मुसळधार ते अति मुसळधार स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे तरीही पुढील पाच दिवसात एकाच दिवस अति मुसळधार पाऊस असल्यामुळे ज्या ठिकाणी पेरणी पावसापूर्वी झाली होती व सध्य परिस्थितीमध्ये रोपे लावणीयोग्य झाली असतील तर अश्या ठिकाणी भाताची पुनर्लागवड करण्याची कामे हाती घेण्यात यावीत. |
| नागली | रोपवाटीका व्यवस्थापन व पुनर्लागवड | येत्या आठवड्यात सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये बहुतांश ठिकाणी मुसळधार स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे तरी ज्या ठिकाणी नागली पिकाची पेरणी झाली होती व रोपे उगवून आली आहेत अश्या ठिकाणी चारही बाजुंनी खोल चारी काढावी यामुळे पाऊस जास्त झाला तरी पाण्याचा निचरा होण्यास मदत होईल व कोवळी रोपे मरण्याचे प्रमाण कमी राहिल.<br>दिनांक २० ते २४ जून २०२० दरम्यान बहुतांश ठिकाणी मुसळधार तर दिनांक २० जून २०२० रोजी तुरळक ठिकाणी मुसळधार ते अति मुसळधार स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे तरीही पुढील पाच दिवसात एकाच दिवस अति मुसळधार पाऊस असल्यामुळे ज्या ठिकाणी पेरणी पावसापूर्वी झाली होती व सध्य परिस्थितीमध्ये रोपे लावणीयोग्य झाली असतील तर अश्या ठिकाणी नागली ची पुनर्लागवड करण्याची कामे हाती घेण्यात यावीत. |
| भुईमुग | पेरणी | डॉ. बा. सा. कोकण कृषि विद्यापीठाने शिफारस केलेल्या कोकण गौरव व ट्रॉम्बे कोकण (टपोरा) तसेच टी.जी.२६, टी.ए.जी. २४, टी.पी.जी. ४१ या जातींची निवड करावी. प्रती हेक्टरी १०० ते १२५ किलो बियाणे वापरावे. सततचा पाऊस व ओलाव्यामुळे भुईमुगामध्ये येणाऱ्या मर रोगाचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी थायरम३ग्रॅम/किलो बियाणे या प्रमाणात चोळावे. पुढील पाच दिवसात सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये एकाच दिवस अति मुसळधार पाऊस असल्यामुळे ज्या ठिकाणी भुईमुगाची पेरणी राहिली असेल तर पावसाळी भुईमुगाची पेरणी उरकून घ्यावी |
| आंबा | नवीन लागवड | येत्या पाच दिवसामध्ये आद्रतेचे प्रमाण वाढणार असल्यामुळे आंबा पिकावरील नवीन पालवीवर करपा व भुरी रोगाचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता आहे व प्रादुर्भाव आढळून आल्यास नियंत्रणासाठी पावसाची उघडीप पाहून थायोफिनेट मिथिल व कार्बेन्डाझीम १% १ ग्रम प्रती १ लिटर पाण्यातुन फवारावे.<br>येत्या पाच दिवसामध्ये वाऱ्याचा वेग वाढणार असून नवीन लागवड केलेली कलमे पडू शकतात आवश्यकता भासल्यास कलमांना काठीने आधार देऊन कलमांना मातीची भर द्यावी. आंबा बागेतील अतिरिक्त पाण्याचा निचरा करावा |
| काजु | नवीन लागवड | येत्या पाच दिवसामध्ये वाऱ्याचा वेग वाढणार असून नवीन लागवड केलेली कलमे पडू शकतात आवश्यकता भासल्यास कलमांना काठीने आधार देऊन कलमांना मातीची भर द्यावी.<br>काजुवर खोडिकडा (रोठा) या किडिचा प्रादुर्भाव आढळून आल्यास १५ मि.मी. पटाशिच्या सहाय्याने प्रादुर्भित साल काढून झाडातील रोठ्याला बाहेर काढून मारुन टाकावे व तो भाग ५% प्रवाही फिप्रोनील २ मी. लि. प्रति १ लिटर पाण्यामध्ये मिसळून चांगला भिजवावा.<br>काजुमध्ये काढणीनंतर जुन्या व रोगट फांद्या कापून त्या ठीकाणी १% बोर्डोमिश्रन लावावे. |
| नारळ | नवीन लागवड | येत्या पाच दिवसामध्ये वाऱ्याचा वेग वाढणार असून नवीन लागवड केलेली रोपे पडू शकतात आवश्यकता भासल्यास कलमांना काठीने आधार देऊन कलमांना मातीची भर द्यावी. नारळ व सुपारीच्या बागेतील अतिरिक्त पाण्याचा निचरा करावा |
| भाजीपाला | पेरणी/ पुनर्लागवड | काही ठिकाणी वेलवर्गीय भाज्यांमध्ये वेल सुटायला सुरुवात झालेली आहे. त्यांना काठीचा आधार द्यावा व मातीची भर द्यावी. तसेच भेंडी, गवार इ. भाज्यांच्या लागवडीच्या ठिकाणी अती पावसामुळे पाणी साठणार नाही याची खबरदारी घ्यावी. तसेच वांगी, मिरचीची रोपे तयार असल्यास पाण्याचा उत्तम निचरा होणा-या ठिकाणी पुर्नलागवड करावी. डॉ. बा.सा. कोकण कृषी विदयापीठाने शिफारस केल्याप्रमाणे भाजीपाला पीकांना खताची मात्रा दयावी. भाजीपाला क्षेत्रामध्ये उगवलेल्या तणांची बेणणी करावी. तसेच नवीन वेलींचे पाने खाणारी अळी, मावा इ. कीडींपासून संरक्षण करावे. |
| दुभती जनावरे व शेळया | | बहुवर्षीय स्वरुपाच्या वैरणीच्या पीकांची उदा. पॅरॅग्रास, यशवंत, नेपीयर इ. लागवड करण्यासाठी शेताची पूर्वतयारी करण्यास सुरुवात करावी.<br>गायी, म्हैशी आणि शेळयांना पशुवैदयकांच्या मार्गदर्शनाखाली धनुर्वात रोग प्रतिबंधक लसीकरण करून घ्यावे. लसीकरणानंतर उत्तम रोगप्रतिकारक शक्ती निर्माण होण्यासाठी चांगला आहार दयावा. |

सदर कृषि सल्ला पत्रिका हा डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठाच्या, प्रादेशिक फळ संशोधन केंद्र, वेंगुर्ले व उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे येथील "ग्रामिण कृषि मौसम सेवा" योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशी वरुन तयार करुन प्रकाशित करण्यात आली.


डॉ. प्रदिप च. हळदवणकर
सहयोगी अधिष्ठाता तथा नोडल ऑफिसर
कृषी हवामानशास्त्रीय क्षेत्र एकक
ग्रामिण कृषि मौसम सेवा
उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे
०२३६२-२४४२३१

डॉ. यशवंत चं. मुठाळ
तांत्रिक अधिकारी
कृषी हवामानशास्त्रीय क्षेत्र एकक
ग्रामिण कृषि मौसम सेवा
उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे
०२३६२-२४४२३१